पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड आयुक्तालय
प्रेमलोक पार्क सोसायटी, चिंचवड पुणे-४११०३३
Phone No.020-26209121 E-mail id:- cp.pcpc-mh@gov.in

जा. क्र.:एमओबी /प्रतिबंधात्मक आदेश / 1330 /२०२२ दिनांकः- ०३.११.२०२२

**विषयः- प्रतिबंधात्मक आदेश**

१/- ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये दाखल असलेल्या खुन, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोडा यासारखे गंभीर व इतर गुन्ह्यांमध्ये आरोपी कडुन कोयता, पालघन व तत्सम दिसणारे कोयत्यासारखे हत्यार वापरुन असे गुन्हे केलेले असल्याचे दिसुन आलेले आहे. तसेच अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांकडुन समाजामध्ये दहशत पसरवण्यासाठी अशा हत्यारांचा वापर करुन सार्वजनीक व खाजगी ठिकाणावर मोटारींचे नुकसान करण्यात आले आहे. तसेच काही गुन्हेगारांकडुन समाजमाध्यमांवर असे कोयते, पालघन, तत्सम हत्याराचे स्टेटस ठेवुन स्वतःची दहशत पसरविणेसाठी अशा हत्यारांचा वापर करण्यात आलेला असल्याचे दिसुन आलेले आहे. गुन्हेगारांना व समाजकंटकांना अशी हत्यारे बाजारात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. खुल्या बाजारात अशी हत्यारे सहजगत्या उपलब्ध होण्याची शक्यता असल्याने गुन्हेगारांकडुन व समाजकंटकांकडुन अशा हत्यारांचा वापर वरील प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये होण्याची शक्यता आहे.

२/- ज्याअर्थी अनेक सिमकार्ड विक्री करणारे कागदपत्राची पडताळणी न करता व ज्यांना सिम कार्ड विक्री करण्यात आलेली आहे, अशांचे योग्य रेकॉर्ड न ठेवता सिम कार्ड विक्री करत असल्याचे दिसुन आलेले आहे. या कारणामुळे दहशतवादी किंवा समाजविघातक कारवायांमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांकडून अशा प्रकारे होणाऱ्या सिमकार्ड विक्रीचा फायदा घेऊन सिम कार्ड विकत घेऊन त्याचा गैरवापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३/- ज्याअर्थी असे निदर्शनास आले आहे की अनेक लेबर कॉन्ट्रॅक्टर हे त्यांच्याकडे असलेल्या कामगारांचे पुर्व इतिहासाचे चारित्र्य पडताळणी न करता त्यांना कामावर ठेवून त्याची राहण्याची व इतर व्यवस्था करीत असल्याचे दिसुन आलेले आहे.अशा कामगारांचे रेकॉर्ड न ठेवता त्यांना कामावर ठेवुन घेतले जात आहेत.

त्याअर्थी अशा परिस्थीतीचा गैरफायदा घेऊन गुन्हेगार किंवा नक्षलवादी किंवा दहशतवादी हे गुन्हा करुन आल्यानंतर आपले अस्तित्व लपवणेसाठी अशा लेबर कॉन्ट्रॅक्टर च्या मदतीने, कामकरण्याच्या बहाण्याने हद्दीमध्ये आसरा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४/- ज्याअर्थी अनेक लॉज/हॉटेल/गेस्ट हाऊस मालक हे त्यांचेकडे राहण्यास येणा-या ग्राहकांची त्यांचे कागदपत्रांची पडताळणी न करता, त्यांची ओळखपत्रे जमा न करता व रजिस्टर मध्ये अपूर्ण नोंदी घेवून राहण्यास देत असल्याची बाब निर्दशनास आले आहे. तरी सदर बाबींमुळे भविष्यात कार्यक्षेत्रात एखादी अप्रिय घटना, देशविघातक कृत्य घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी माझी अशी खात्री झाली आहे की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात समाजकंटकांना व गुन्हेगारांना अशी हत्यारे सहजगता मिळु नये यासाठी अशा हत्यारांचे उत्पादन करणे, विक्रीसाठी साठा करुन ठेवणे व विक्री करणे. तसेच दहशतवादी घटना / समाजविघातक कृत्य घडु नये याकरिता मोबाईल सिम कार्ड विक्रेते, लेबर कॉन्ट्रॅक्टर व लॉज/हॉटेल/गेस्ट हाऊस मालक यांचेवर निर्बंध घालण्यासाठी भारतीय फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश करण्यास पुरेसे व सबळ कारण आहे.

त्याअर्थी मी अंकुश शिंदे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड वर नमुद मुद्यांच्या अनुषंगाने मला प्रदान असलेल्या भारतीय दंड प्रक्रीया संहिता मधील कलम १४४ (१) मधील अधिकारांचा वापर करुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्य कार्यक्षेत्रात दिनांक ०४.११.२०२२ रोजीचे ००.०१ पासुन ते दिनांक

Scanned with CamScanner

०२.०१.२०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंतच्या या कालावधीत खालील नमुद केलेली कृत्य करण्यास आदेशान्वये प्रतीबंध करण्यात येत आहे.

१) नऊ इंच किंवा त्यापेक्षा जास्त लोखंडी पाते असलेले कोयता, पालघन व तत्सम लोखंडी हत्यार विक्री साठी बनवणार नाही किंवा विक्रीसाठी त्याचा साठा करणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे त्याची विक्री करणार नाही.(**सदर आदेश शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांसाठी लागु नाही.**)

२) कोणीही सिम कार्ड विक्रेता सिम कार्ड विक्री करताना ग्राहकाची योग्य पडताळणी व खात्री केल्या शिवाय, रजिस्टर मध्ये नोंद घेतल्या शिवाय मोबाईल सिमकार्ड विक्रेता बनावट कागदपत्रांचे आधारे/ दुसऱ्या व्यक्तीच्या कागदपत्रांचे आधारे सिमकार्ड विक्री करणार नाही. (सिमकार्ड विक्री करण्याकरिता कोणते सिमकार्ड कोणास विक्री केले यासाठी रजिस्टर ठेवुन ते किमान ५ वर्षाकरिता जतन करील.) सिमकार्ड विक्री करणारे विक्रेता हे सिमकार्ड विक्रीचे रजिस्टर आपल्या दुकानांमध्ये ठेवून त्या सिमकार्ड ग्राहकाची माहिती नमुद करतील. पोलीस व इतर तपासणी यंत्रणांना आवश्यक त्या वेळी सादर करतील.

३) कोणीही लेबर कॉन्ट्रॅक्टर आपल्याकडे कामावर कामगार ठेवताना त्याच्या पुर्व चारित्र्याची पडताळणी केल्या शिवाय व त्यांचे कागदपत्रांची पडताळणी केल्याशिवाय त्यांना अवैधपणे कामावर ठेवणार नाही अगर त्यांची रहाण्याची व्यवस्था करणार नाही. लेबर कॉन्ट्रॅक्टर हे कामावर ठेवलेल्या कामगारांचे रजिस्टर तयार करुन त्या मध्ये कामगारांची वैयक्तीक माहिती नमुद करतील. पोलीस व इतर तपासणी यंत्रणांना आवश्यक त्या वेळी सादर करतील.

४) कोणीही लॉज/हॉटेल/गेस्ट हाऊस मालक हे ग्राहकांचे संपुर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर व ओळखपत्राची रजिस्टर मध्ये नोंद करतील. पोलीस व इतर तपासणी यंत्रणांना आवश्यक त्या वेळी सादर करतील.

१. सदर प्रतिबंधात्मक आदेश हा संपुर्ण पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये लागू करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती हा भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये **फौजदारी कारवाईस पात्र राहील.**

३. सदर आदेशाची बजावणी वैयक्तीकरित्या सर्व इसमांवर करणे शक्य नसल्याने भारतीय दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) अन्वये आदेशाची जाहीर प्रसिद्धी करुन बजावणी करण्यात येत आहे.

**सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक ०३.११.२०२२ रोजी दिलेला आहे.**

**ठिकाण :- पिंपरी चिंचवड**
**दिनांक :- ०३.११.२०२२**

(अंकुश शिंदे)
पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner